# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव

Phone No. –( 02472) 223388 Fax No.-(02472) 223377

जा.क्र.जिपउ/साप्रवि/ने-4/कावि/ 1706 /2025 दिनांक—12 /09/2025

## जाहीर आवाहन

## जिल्हा परिषद धाराशिव सन 2025 अनुकंपा पदभरती प्रक्रिया अपूर्ण कागदपत्र पूर्ण करणे बाबत

जिल्हा परिषद धाराशिव मार्फत अनुकंपा पदभरती सन 2025 ची प्रक्रिया सुरु असून अनुकंपा पदभरती प्रतिक्षासुची यादीवर एकूण 1 ते 157 इतके उमेदवार आहेत. यानुषंगाने दिनांक-03/09/2025, दि. 04/09/2025, तसेच दिनांक-08/09/2025 रोजी जिल्हा परिषद स्थायी समिती सभागृह, धाराशिव तसेच तदनंतर सामान्य प्रशासन विभाग जि.प.धाराशिव येथे वेळोवेळी अपूर्ण कागदपत्र पूर्ण करणे तसेच मुळ शैक्षणिक कागदपत्र पडताळणीसाठी कॅम्पचे आयोजन करण्यात आलेले होते. असे असतानाही जवळपास 54 इतके उमेदवार कागदपत्र पडताळणीसाठीच्या कॅम्पला अनुपस्थित होते.

कॅम्पला अनुपस्थित असलेले उमेदवार तसेच उपस्थित असलेल्या उमेदवारांपैकी जवळपास 100 इतक्या उमेदवारांनी त्यांचे प्रस्तावासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्राची अद्यापही पुर्तता केलेली नसल्याचे बाब प्रस्ताव तपासणीमध्ये निदर्शनास आलेली आहे.

सन 2025 मधील अनुकंपा भरती प्रक्रियेमध्ये उमेदवारास नियुक्ती देण्यासाठी त्याची शैक्षणिक कागदपत्र व प्रस्तावातील इतर सर्व आवश्यक अभिलेखे परिपूर्ण असणे आवश्यक आहे.

अपूर्ण प्रस्ताव असलेल्या उमेदवारांसाठी त्यांचे प्रस्ताव पूर्ण करणेसाठी दि. 13/09/2025 व दि. 14/09/2025 या सुटटीचे दिवशी जिल्हा परिषद धाराशिव (सामान्य प्रशासन विभाग, जि.प.धाराशिव) कार्यालय सकाळी 9.45 ते सायं. 6.15 या कार्यालयीन वेळेत सुरु ठेवण्यात आलेले आहे.

तरी अपूर्ण प्रस्ताव असलेल्या उमेदवारांनी त्यांचे आवश्यक कागदपत्राची मुळ शैक्षणिक कागदपत्रासह दि.14.09.2025 कार्यालयीन वेळेत पुर्तता करावी. जेणेकरुन त्यांचा सन 2025 मधील अनुकंपा पदभरतीसाठी विचार करता येईल.

याउपरही अनुकंपा नियुक्तीचे अनुषंगाने आवश्यक कागदपत्र तसेच मुळ शैक्षणिक व अन्य कागदपत्राची पुर्तता न केल्याने ज्या उमेदवारांचे प्रस्ताव अपूर्ण राहतील अशा उमेदवारांचा सन 2025 मधील अनुकंपा भरतीसाठी अपूर्ण प्रस्तावाअभावी विचार केला जाणार नाही, याची सर्वस्वी संबधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.

अनुकंपा पदभरती सन- 2025 चे अनुषंगाने असे आवाहन जिल्हा परिषद धाराशिव प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

(डॉ.मैनाक घोष भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद धाराशिव